**LIBRARY SCHOLAR**
*International Peer-Reviewed Journal of Library Science*

ISSN
2583-2549

# ई-प्रकाशने/ ई-ग्रंथ ग्रंथालयात वाचकांना उपलब्ध करून देतांना विद्यापीठ ग्रंथपालांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय, व्यवस्थापकीय आणि वित्तीय समस्या

**पुरुषोत्तम प्रल्हाद कावळे**
**संशोधक**
ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
e-mail:- purukawale519@mail.com

**डॉ. संजय शामराव भुतमवार**
**विभाग प्रमुख**
ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग
सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
e-mail:- sbhutamwar@mail.com

---

***सारांश :-*** *सदर निबंधात ई-स्वरुपातील वाचन साहित्याचे फायदे, तोटे, गुण, दोष आणि प्रकाशकांकडून ई-प्रकाशने ग्रंथालयांना पुरवीत असतांना अमलात आणलेल्या DRMS मुळे ग्रंथपालांना आपल्या ज्ञान स्रोत केंद्रातून अभ्यासकांना ई अभ्यास साहित्य पुरावितांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय, व्यवस्थापकीय व वित्तीय समस्या आणि या समस्या भविष्यात येणार नाही आणि आल्या तरी त्यांचा प्रभाव सौम्य करण्याकरीता काय काळजी घ्यावी जेणेकरून समस्यांवर मत करून आपल्या वाचकांना उच्च दर्जाचे ई-स्वरुपात वाचन साहित्य अविरत विनाखंड उपलब्ध करून देणे शक्य होईल, याचा अंशतः अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.*

***शोध संज्ञा :-*** *ई-प्रकाशन, ई-ग्रंथ, ग्रंथालय, ग्रंथपाल, प्रशासन, व्यवस्थापन, वित्त, समस्या*

---

**प्रस्तावना:-**

मागील एक दोन दशकांपासून आभासी वाचनालयाची कल्पना फार जोर धरु लागली आहे. अर्थात ही संकल्पना तशी जुनीच आहे याची (आभासी ग्रंथालयाची) चाहूल पन्नास साठ वर्षापूर्वी पासूनच येवू लागली. मात्र २१ व्या शतकात संगणक आणि माहिती संप्रेशनाच्या क्षेत्रात आलेला क्रांतिकारक विकास, अतिजलद इंटरनेट सेवेची उपलब्धता, मोबाईल व बिनतारी तंत्रज्ञानाचा झपाट्याने झालेला विकास आणि प्रकाशन कार्यात आधुनिक तंत्राचा शिरकाव यामुळे डिजिटल ग्रंथालये उभारणे आणि ज्ञानपिपासू लोकांना आवश्यक असलेली माहिती त्यांच्या ठिकाणी मोबाईल व इतर इलेक्ट्रॉनिक साधनांवर उपलब्ध करून देणे फार सोपे झाले आहे.

ग्रंथ प्रकाशन क्षेत्रातील स्पर्धा, पारंपरिक ग्रंथ प्रकाशनाचा वाढता खर्च आणि त्यामानाने आभासी रुपात ग्रंथ प्रकाशित करणे, वितरीत करणे सोपे, अतिजलद आणि कमी खर्चाचे झाले आहे. शिवाय वाचकांकडून आभासी वाचन साहित्याची वाढती मागणी आणि दिवसेंदिवस डिजिटल ग्रंथालयाची व्यापक होत जाणारी संकल्पना यामुळे सध्या ग्रंथालयांमध्ये प्रकाशकांकडून ई-प्रकाशन/ ई-ग्रंथ ची मागणी केली जात आहे.

ग्रंथालयात ई-प्रकाशन/ ई-ग्रंथ उपलब्ध करून देत असतांना प्रकाशकांकडून छुप्या स्वरुपात बऱ्याच अटी व शर्ती लादल्या जातात. त्याच्याशी निगडीत तांत्रिक बाबी ग्रंथापालांपासून लपविल्या जातात. त्यामुळे भविष्यात ग्रंथपालांना e-Publication च्या उपलब्धतेच्या बाबतीत प्रशासकीय, व्यवस्थापकीय आणि वित्तीय अडचणींना तोंड द्यावे लागत असते.

**पूर्व संशोधन साहित्याचा आढावा:**

**Chandel and Saikia (2012)** “Challenges and Opportunities of e-Resources”, सदर शोधनिबंधात संशोधकांनी इ-संसाधनांच्या वापरातील संधी आणि आव्हानांवर चर्चा केली असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरणे, इ-संसाधनांच्या उत्क्रांती आणि विकासाचा वेग बघता आणि नजीकच्या काळात इ-संसाधनांची उपलब्धता, उपयोगिता लाक्षत घेता या संसाधनांची निर्मिती, वापर, देखभाल, व्यवस्थापन आणि वितरणाशी निगडीत समस्यांवर मात करण्यासाठी व उपलब्ध सर्व मुद्रित सामग्रीसह ही सर्व संसाधने एकत्रित करून सिंगल विंडो सर्च द्वारे वितरण करु शकणारे ERMS विकसित किंवा प्राप्त करण्याच्या गरजेवर भर देण्यात आला आहे.**Invalid source specified.**

**Cleveland, Gary (1998)** “Digital Libraries: Definitions, Issues and Challenges”, प्रस्तुत अभ्यासात संशोधकाने आभासी ग्रंथालयाची संकल्पना स्पष्ट करून आभासी ग्रंथालय तयार करण्यात येणाऱ्या समस्या व आव्हानांसह डिजिटल ग्रंथालयांनी सहकारी तत्त्वावर कार्य करण्यात येणाऱ्या समस्यांवर दृष्टिक्षेप टाकले आहे. आणि अपवादात्मक स्थिती वगळता सर्वप्रथम तांत्रिक व कायदेशीर आव्हानांवर मत केल्याखेरीज आभासी ग्रंथालयाची संकल्पना कल्पनेपेक्षा कठीण आहे असे निष्कर्ष नोंदविले आहेत.**Invalid source specified.**

**Okogwu, Flora Ifeoma,** “Difficulties of accessing resources among postgraduate library users in university libraries in Southeast Nigeria”, सदर संशोधनात संशोधकाने वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून दक्षिण पूर्व नायजेरियातील विद्यापीठ ग्रंथालयांमध्ये पदव्युत्तर ग्रंथालय वापरकर्त्यांना इलेक्ट्रॉनिक संसाधनांमध्ये प्रवेश करण्यात येणाऱ्या, माहितीच्या ओव्हरलोड, संसाधनांमध्ये प्रवेशाचा अभाव, अनियमित वीजपुरवठा, संथ इंटरनेट कनेक्टिव्हिटी, सदस्यता रद्द केल्यामुळे सामग्रीमध्ये प्रवेश न मिळणे, प्रवेश गमावणे, सामग्री उपलब्धतेत खंड पडणे ह्या समस्या ओळखल्या आहेत, आणि संबंधित ग्रंथालयांनी वेगवान इंटरनेट, इलेक्ट्रॉनिक संसाधनांचे सतत नूतनीकरण करणे, स्वतःची इलेक्ट्रॉनिक संसाधने विकसित करणे, पर्यायी वीज पुरवठा, करून ग्रंथालयाच्या समस्यांवर मात करण्यासाठी ग्रंथालयाकरिता दरवर्षी वाढीव अर्थसंकल्पाची तरतूद केली पाहिजे शिफारस केली आहे.**Invalid source specified.**

**Ukonu, Wogu and Obayi,** “Problems and challenges facing the University of Nigeria Undergraduate students in the use of the Unn digital library”, या शोधनिबंधात नायजेरियन विद्यापीठ पदवीधर विद्यार्थ्यांना संस्थेच्या डिजिटल ग्रंथालयाच्या वापरात येणाऱ्या समस्यांचे अध्ययन केले आहे. त्यात मल्टीमिडीया विषयी जागरूकतेचा अभाव, ग्रंथालयाच्या उद्देश विरुद्ध ग्रंथालय इंटरनेट कॅफे सारखे चालविणे, ई-पुस्तके पुरवठादार प्रतिष्ठानाच्या सदस्यत्वाचा अभाव ह्या डिजिटल ग्रंथालय वापरात येणाऱ्या मुख्य समस्या ओळखण्यात आल्या असून विद्यार्थ्यांना डिजिटल ग्रंथालयाची अखंड सेवा उपलब्ध होण्याकरिता ग्रंथालयाने नियमितपणे ई-पुस्तकांच्या सबस्क्रिप्शनचे नूतनीकरण केले पाहिजे आणि विद्यार्थ्यांना इतर आभासी ग्रंथालयातील पुस्तकांचा लाभ मिळण्यासाठी प्रवेश मिळावा म्हणून इतर ग्रंथालयांसोबत सहकारी तत्त्वावर काम करण्याचे मार्ग शोधण्यावर भर दिला आहे.**Invalid source specified.**

**अभ्यासाचे उद्दिष्ट:-** प्रस्तुत शोध निबंधात संशोधकांकडून ग्रंथपालांना ग्रंथालयात ई-प्रकाशने/ ई-ग्रंथ उपलब्ध करतांना त्याचे होणारे फायदे, तोटे व ग्रंथापालांना भेडसावणाऱ्या संभाव्य प्रशासकीय, व्यवस्थापकीय आणि वित्तीय समस्या जाणून घेण्याच्या उद्देशाने अध्ययन करण्यात आले आहे.

**अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा:-** प्रस्तुत शोध निबंधात केवळ ग्रंथालयात ई-प्रकाशने उपलब्ध करतांना होणारे फायदे, तोटे व भेडसावणाऱ्या संभाव्य समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे सादर अभ्यासाची व्याप्ती केवळ ई-प्रकाशनांपुर्तीच मर्यादित आहे.

**संशोधन पद्धती:-** सदर संशोधनाकरिता संशोधकांकडून online content analysis ह्या पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून ही online research method ची एक पद्धती आहे. ORM म्हणजे ऑनलाइन संशोधन पद्धती आहे, ज्यात अभ्यासक इंटरनेट महाजालाचा वापर करून आवश्यक डेटा मिळवू शकतात. संशोधनाच्या या पद्धतीला i-science, इंटरनेट संशोधन किंवा वेब संशोधन पद्धती असेही संबोधले जाते. ही पद्धती सध्या उपलब्ध पद्धतीशी संबंधीत आहे मात्र सोशल मीडियाच्या विकासामुळे नवीन संधीची पातळी निर्माण झाली आहे. संशोधनात सोशल मीडियाचा समावेश ग्राहक आणि सामाजिक विभागांमध्ये अद्वितीय अंतर्दृष्टी प्रदान करू शकतो आणि आवश्यक मुद्यांवर डेटा मिळवू शकतो. **Invalid source specified.**

**ग्रंथालयात सध्या ई-प्रकाशनांची उपलब्धता:-**

सध्या मोजक्या निवडक शैक्षणिक ग्रंथालयात ई -प्रकाशने आणि तेही फार थोड्या प्रमाणात उपलब्ध आहेत. मात्र आता शासनाकडून वेळोवेळी ग्रंथालयातील संग्रहाबाबत माहिती मागितली जाते, त्यातही ई -संग्रहाबाबत शासन स्तरावर शिक्षण खात्याकडून IQAC, IQAR, MIS च्या माध्यमातून दर वर्षी माहिती मागितली जात आहे. शिवाय महाविद्यालयांना दर ५ वर्षांनी NAAC समिती कडून मुल्यांकन करीत असतांना देखील ई -संग्रहाबाबत माहिती विचारली जाते आणि त्यावर गुण दिले जातात. त्यादृष्टीनेही वाचनालयातून ई-प्रकाशने पुरविण्यास भर दिला जावू लागला आहे. वाचकांकडून ई-नियतकालिके, ई-ग्रंथ यांची वाढती मागणी, ई-प्रकाशनांची उपलब्धता आणि ती अभ्यासकांना देण्यातील सुलभता यामुळे वाचनालयांनी आपल्या ई-संग्रहात वाढ करण्यास सुरुवात केली आहे.

**ई-प्रकाशनांची व्याख्या:-**

ई -प्रकाशने स्वरूप, ती संग्रहणाची साधने, ती वाचण्याकरिता उपयोगात येणारी माध्यमे यावरून ई-प्रकाशनांची खालील प्रमाणे व्याख्या करता येईल.

"सर्वसामान्य ग्रंथाप्रमाणे वाचण्यास सुलभ मात्र मूर्त स्वरुपात उपलब्ध नसून कोणत्या तरी तांत्रिक उपकरणात इलेक्ट्रॉनिक/ आभासी स्वरूप संग्रहीत असणारे आणि विशिष्ट विद्युतीय उपकरणाच्या माध्यमातून वाचता येणारे अदृश्य ग्रंथ म्हणजे ई -ग्रंथ/ ई-प्रकाशन होय."

E-books are basically text, Images and even audio video package into a single electronic file Invalid source specified.

**ई -प्रकाशनाचे फायदे :-**

**१ ) उत्पादन खर्च :-**

ई -ग्रंथ/ ई-प्रकाशनाच्या तुलनेने सर्वसामान्य ग्रंथ तयार करताना लागणारे कागद, छपाई यंत्रसामुग्री व इतर संबंधित साहित्य, त्याकरीता लागणारा कार्यकुशल कर्मचारी वर्ग, प्रकाशित ग्रंथांची वाहतूक इत्यादी वर होणाऱ्या खर्चाची ई -ग्रंथ/ ई-प्रकाशनाच्या बाबतीत बचत होत असते. त्यामुळे ई-प्रकाशनाचा उत्पादन खर्च कमी होत असतो.

**२ ) जागेची बचत :-**

आभासी वाचन साहित्याच्या संग्रहणाकरिता अत्यंत कमी जागेची आवश्यकता असते. संगणकाला जेवढी जागा लागेल त्याच संगणकाच्या Hard Drive मध्ये शेकडो ई -ग्रंथ/ ई-प्रकाशने संग्रहित करून ठेवता येतात जे पारंपरिक ग्रंथ संग्रहाच्या बाबतीत शक्य नाही.

**३ ) मागणी नुसार छपाई :-**

एकदा ई -ग्रंथ/ ई स्वरुपात प्रकाशाने तयार झाली की हवे तेव्हा दर्जाची तडजोळ न करता पाहिजे तेवढी ग्रंथ मुद्रित करता येत असल्याने खूप आधीपासून छापून ठेवलेले ग्रंथ खराब होण्याचे आणि ते कोठारात साठवनुकीचीही समस्या येत नाही.

**४ ) वाचनातील सुलभता :-**

ई-प्रकाशने वाचनाकरिता ज्या माध्यमांवर पुरविली जातात अशी माध्यमे हाताळणे, त्यांचा उपयोग करणे अतिशय सोपे झाले, नव्हे त्यांचा वाचकांना फार सराव झालेला आहे. त्यामुळे अश्या माध्यामांमुळे ई-प्रकाशने अक्षर स्वरुपात वाचता येतात, चलचित्र स्वरुपात पाहता येतात, ध्वनिमुद्रित ऐकता येतात त्यामुळे सुदृढ व्यक्तीबरोबरच दिव्यांगांनाही वाचनाचा आनंद घेता येतो.

**५ ) Searchable :-**

बरीचशी ई-प्रकाशने searchable असतात, म्हणजे वाचकाला संपूर्ण ग्रंथ न वाचता जर त्या ग्रंथाच्या विशिष्ट पान क्र., प्रकरण किवा विशिष्ट शब्दावर जायचे असेल तर ग्रंथाच्या search सुविधेमध्ये जाऊन त्याला पाहिजे ती गोष्ट शोधून सरळ त्या ठिकाणी जाता येते.

**६ ) वेळेची बचत :-**

ई-प्रकाशने online उपलब्ध होत असल्यामुळे त्यांना खरेदी करण्याकरीत कोणत्याही स्टोअर मध्ये न जाता वेगवेगळ्या वेबसाईट वरून उपलब्ध ग्रंथांपैकी पाहिजे असलेले ग्रंथ त्याच क्षणी खरेदी करून आलेल्या लिंकच्या माध्यमातून किवा वेबसाईट वरून डाऊनलोड करून वाचता येतात त्यामुळे खरेदी करीता स्टोअर मध्ये जाण्या येण्याचा व वाहतुकीत खर्च होणारा वेळ वाचतो आणि पाहिजे असलेली माहिती कमीत कमी वेळेत मिळविता येते.

**७ ) ई -ग्रंथ/ ई-प्रकाशनाचे जतन :-**

एकदा ई -ग्रंथ/ ई-प्रकाशन तयार झाले कि त्यात सहजासहजी खोडतोड करणे कठीण असते परिणामी ई -ग्रंथ/ ई-प्रकाशन दीर्घ काळासाठी मूळस्वरुपात जतन करणे सोपे जाते.

**८ ) आवश्यकतेनुसार प्रकारनांची उपलब्धता :-**

एखाद्या ई -ग्रंथातील विशिष्ट प्रकरण जर उपयोगाचे असेल तर केवळ तेवढीच प्रकरणे मागणी करण्याची सुलभता ई-प्रकाशनात असते त्याने संपूर्ण ग्रंथाची किंमत न देता तेवढ्या प्रकरणाचे पैसे मोजावे लागते त्याने ग्रंथालयाची आर्थिक बचत होते.

**ई -प्रकाशनाचे तोटे :-**

**१ ) वाचनातील असुलभता :-**

ई -ग्रंथ/ आभासी वाचा साहित्य विद्युतीय साधनात संग्रहित असतात आणि ते वाचण्याकरिता e-reader, I-pad, mobile, computer ची आवश्यकता असते. या साधनांच्या दृश्य पटलावरील माहिती एकसारखे बसून वाचणे सहज शक्य नसते स्क्रिनला सारखे मागे पुढे खाली वर करत राहावे लागते.

**२ ) ई -ग्रंथ/ ई-प्रकाशनातील विविधता :-**

ई-प्रकाशने विविध प्रकाशकांकडून प्रकाशित करण्यासाठी HTML, PDF, EBL, EPUB अशा वेगवेगळ्या format मध्ये उपलब्ध असतात आणि त्यांना वाचण्याकरिता वेगवेगळे रीडर aaps किवा software ची आवश्यकता भासत असते. अशा वेळी कोणत्या format मधील ई-प्रकाशने वाचण्याकरिता कोणते app लागते आणि ते त्यावेळी उपलब्ध नसल्यास ती ई-प्रकाशने वाचण्यात अडचण निर्माण होते. शिवाय वेगवेगळे रीडर aaps instol करून ठेवल्याने ई-प्रकाशने वाचण्याकरिता लागणाऱ्या माध्यमाची हार्ड डिस्क रीडर aaps नेच भरून जाईल.

**३ ) आरोग्य विषयक समस्या :-**

e-reader, I-pad, Mmobile, computer अशा साधनांवर सतत काम केल्याने त्याचा मानवी डोळे, मेंदू, पाठीचे मणके आणि संपूर्ण मांसपेशी बाबत विविध आरोग्य विषयक समस्या निर्माण झाल्याबाबतची अनेक अध्ययने समोर आली आहेत.

**४ ) वाचकांच्या खाजगी आयुष्यावर टेहळणी :-**

ई-ग्रंथ/ ई-प्रकाशने वाचण्याकरिता उपयोगात आणल्या जाणाऱ्या e-reader/ रीडर aaps च्या माध्यमातून वाचकांनी कोणती ई-ग्रंथ/ ई-प्रकाशने वाचली, त्यात कोणत्या प्रकरणात किती वेळ दिला, ते प्रकरण कितीदा वाचले, वाचकाने कशा प्रकारची माहिती वाचली अशा प्रकारे वाचकाची माहिती गोळा करण्याची क्षमता असते. त्यामुळे भविष्यात या तंत्रात होणाऱ्या प्रगती मुळे अभ्यासकांच्या खाजगी माहितीचा दुरुपयोग होऊ शकतो. किंबहुना तशी संभावना अधिक राहील. **Invalid source specified.**

**५ ) ई-स्वरुपात शैक्षणिक पाठ्य सामग्रीची मर्यादित उपलब्धता :-**

पाठ्य सामग्रीची मागणी विशिष्ट वर्ग पुरतीच मर्यादित असते. शिवाय वेगवेगळ्या विद्यापीठात एकाच विद्याशाखेचे अभ्यासक्रम वेगवेगळे असतात. परिणामी प्रकाशकांना वेगवेगळ्या विद्यापीठांकरिता वेगवेगळी ई-प्रकाशने तयार करावी लागतील, ज्याने खर्चाच्या तुलनेत फारसा नफा मिळणार नाही. त्यामुळे प्रकाशक पाठ्य सामग्री पेक्षा कथा, कादंबरी, नाटक, काव्यसंग्रह, नामवंतांचे जीवन चरित्र यांच्या प्रकाशनात जास्त रस दाखवितात. त्यामुळे ई-स्वरुपात शैक्षणिक पाठ्यसामग्रीची उपलब्धता फार कमी/ मर्यादित आहे.

ग्रंथालयात उपलब्ध होणारे कोणतेही वाचन साहित्य ते छापील असो वा ई-स्वरुपात, ते सर्व प्रकाशकांच्या माध्यमातूनच उपलब्ध होत असते आणि प्रकाशक ही व्यावसाईक संकल्पना आहे. प्रकाशकांची फळी नफा कमाविण्या करिता कार्य करीत असते. कामात नफा नसेल तर ते काम कोणीही करणार नाही. ई-ग्रंथ/ ई-प्रकाशनाचे जे फायदे आहेत जसे ग्रंथ कॉपी करणे, downloade करणे, e-mail किंवा ब्लूटूथ वा अन्य मार्गाने जलद गतीने वितरीत करता येणे यामुळे प्रकाशकांना व्यवसायात तोटा होऊन व्यवसाय बुडू शकतो. त्यामुळे प्रकाशकांकडून ई-ग्रंथ/ ई-प्रकाशनाच्या वापरावर आणि वितरणावर नियंत्रण करण्याकरिता DRM (Digital Right Management) चा वापर करण्यात येतो.

प्रकाशकांकडून उपयोगात आणले जाणारे DRM हे प्रकाशकांच्या फायद्यांना लक्षात घेऊन तयार केले जातात आणि या माध्यमातून प्रकाशन विविध अटी व शर्तीच्या अधीन वाचनालयांना अभ्यास साहित्य पुरवीत असतो. या DRMS च्या विविध अटी व शर्तीमधील सर्व बाबींची सखोल माहिती प्रकाशकांकडून ग्रंथपालांना दिली जात नाही. ह्या DRMS च्या विविध छुप्या अटी व शर्तीमुळे ग्रंथपालांना काही प्रशासकीय, व्यवस्थापकीय आणि वित्तीय अडचणींना तोंड द्यावे लागते.

**ग्रंथपालांना भेडसावणाऱ्या काही प्रशासकीय समस्या :-**

**१ ) मर्यादित परवाना (Limited License) :-**

या अंतर्गत प्रकाशकांकडून प्रकाशित वाचन साहित्य वाचनालय मार्फत सभासदांना फक्त उपयोगाची परवानगी असते, मात्र वाचा किंवा ग्रंथालायाकडून त्या प्रकाशनाची कॉपी करता येत नाही, त्याची प्रिंट काढता येत नाही, किंवा download केली तरी download केलेली कॉपी विशिष्ट दिवसात आपोआप नष्ट होत असते. शिवाय download केलेली कॉपी कुणाला forword होणार नाही अशी बंधने लादलेली असतात.

**२ ) केंद्रीय Server द्वारे सेवा :-**

प्रकाशकांकडून ई-प्रकाशने स्वतः च्या sarver द्वारे पुरवीत असतो आणि ते ग्रंथालयापासून फार लांब असते. अशा वेळी त्या ठिकाणी काही अडचणी आल्यास तेवढा वेळ सेवा खंडित होण्याची शक्यता असते. सेवेचा वेग , उपलब्ध साहित्याची सुस्पष्टता आणि सेवेच्या अखंडतेवर सदैव अनिश्चिततेचे सवट असते. शिवाय प्रकाशकांकडून केंद्रीय server द्वारे सेवा पुरवीत असतांना ग्रंथालयातून पुरविल्या जाणाऱ्या सेवांवर ग्रंथालयाचे नियंत्रण न-राहता प्रकाशकांचे नियंत्रण राहिल्याने वाचनालयातून कोणते अभ्यास साहित्य अभ्यासकांना पुरविले जाईल हे प्रकाशक नियंत्रित करेल ही बाब ग्रंथालय प्रशासनास भविष्यात प्रशासकीय दृष्टीने अडचण निर्माण करणारी ठरु शकते.

**३ ) अधिकाराचे केंद्रीकरण :-**

बरेच प्रकाशक ई-प्रकाशने उपलब्ध करण्याबाबतचे सर्व अधिकार स्वतः कडे राखून ठेवीत असतात. जसे कोणतीही पूर्व सूचना न देता पुरविलेल्या शिर्षकांपैकी काही शिर्षक मध्येच बदलणे, त्या एवजी दुसरेच शिर्षक पुरविणे अशा वेळी एखादे शिर्षक जर अभ्यासक्रमात समाविष्ट असेल आणि ते बदलले गेले तर अशा वेळी अध्यापक, अध्ययनार्थी व वाचनालयांना त्रास होईल.

**४ ) माहिती करिता परावलंबित्व :-**

शासन स्तरावरून ग्रंथालयीन संग्रहाबाबत विविध माहिती AQAR, IQAC च्या मार्फत, NAAC अशा ठिकाणाहून तातडीने मागितली जाते. अशावेळी ई-प्रकाशनाच्या बाबतीत ग्रंथालय प्रशासनाला माहिती करीता वेगवेगळ्या ई-प्रकाशन पुरवठादारांवर अवलंबून राहावे लागून प्रशासनाला माहिती पुरविण्यास विलंब होईल जे ग्रंथालय प्रशासनाच्या हिताचे नाही.

**५ ) प्रत्येक्ष ग्रंथसंग्रहात ग्रंथांची उपलब्धता :-**

ई-प्रकाशनाच्या बाबतीत प्रकाशकांकडून ग्रंथालयांना एक वर्ष, दोन वर्ष अशा विशिष्ट कालावधी करिता सभासदत्त्व दिले जाते आणि त्या सभासदतत्वाच्या आधारावर त्या प्रकाशकांकडून उपलब्ध ई-प्रकाशने ग्रंथालयाला तेवढ्याच कालावधीत सेवा पुरविली जाते हा कालावधी समाप्त झाला की प्रकाशकाकडून सेवा समाप्त केली जाते. सेवा समाप्त होताच सदर ग्रंथ/ अध्ययन सामग्री वाचनालयात उपलब्ध होणे बंद होते. अशावेळी बराच मोठा निधी ग्रंथ खरेदीवर खर्च झालेला असतो मात्र प्रत्यक्षात तेवढे ग्रंथ संग्रहात उपलब्ध राहत नाही. त्यामुळे ग्रंथपालांना भविष्यकाळात मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागू शकते.

**ग्रंथपालांना भेडसावणाऱ्या काही व्यवस्थापकीय समस्या :-**

**१ ) Login क्षमता आधारीत सेवा :-**

या सेवेअंतर्गत प्रकाशकांकडून विशिष्ट शीर्षकाच्या किती login ग्रंथालयाला पाहिजे म्हणजे प्रिंट ग्रंथाच्या दृष्टीने पाहिल्यास विशिष्ट शीर्षकाच्या किती प्रती पाहिजे, त्याप्रमाणे त्या विशिष्ट शीर्षकावर एका वेळी तेवढेच वाचक सेवा घेऊशकतील किंवा ग्रंथालयाला त्या प्रकाशकाकडून घेतलेल्या संग्रहावर एकूण किती वाचक क्षमता login पाहिजे आहे तेवढेच वाचक त्या संग्रहाची सेवा घेऊ शकतील त्यामुळे एखादा अधिकचा वाचक सदर शिर्षक वाचू शकणार नाही, अशा प्रकारे प्रकाशकांकडून Login क्षमता आधारीत सेवा पुरविल्या जातात.

**२ ) दाखल नोंदी घेणे अडचणीचे :-**

ग्रंथालयात पारंपरिक वाचन साहित्याच्या बाबतीत उपलब्ध वाचन साहित्याचा शीर्षकांच्या क्रमाने दाखल नोंदी घेऊन त्याचा लेखाजोखा ठेवला जातो त्याचे वर्गीकरण, तालिकीकरण करणे, ग्रंथालयाच्या नावाचे बोधचिठ्या लावणे आणि नंतर अभ्यासकांना पुरविते, मात्र ई-प्रकाशाने ही समूहाने पुरविली गेल्याने त्यांच्या नोंदी कशा घ्यायच्या, शिवाय त्यांचे catalougus तयार करणे, त्याचे निर्देश तयार करणे व पारंपारिक वाचन साहित्या प्रमाणे इतर ग्रंथालयीन प्रक्रिया ई-प्रकाशनाच्या बाबतीत पार पडणे पारंपारिक ग्रंथालयीन व्यवस्थापनात अवघड होते.

**३ ) आंतर ग्रंथालयीन देवाण घेवाण सेवेवर बंधन :-**

ई-प्रकाशन downloade करणे, copy करणे, किंवा इतर कुणाला forword काराण्यावर प्रकाशकांकडून तांत्रिक बंधने घातली असल्यामुळे एका ग्रंथालायाकडून दुसऱ्या ग्रंथालयास ई प्रकाशाने उपलब्ध करून देता येत नाही. त्यामुळे पारंपरिक ग्रंथालयीन व्यवस्थेत दोन वेगवेगळ्या ग्रंथालयात होणाऱ्या देव-घेव सेवेवर ई-प्रकाशनाच्या बाबतीत बंधने येतात नव्हे ई-वाचन साहित्याच्या उपयोगात DRM मुळे आंतर ग्रंथालयीन देवघेव सेवा देणे शक्य होत नाही.

**४ ) विशिष्ट संगणकीय तांत्रिक कौशल्याची आवश्यकता :-**

ई-प्रकाशनाच्या बाबतीत प्रकाशकांकडून ग्रंथालयांना स्वतः च्या केंद्रीय server द्वारे वाचन साहित्य पुरविली जातात अशा वेळी ग्रंथालयांनी विविध प्रकाशकांकडून घेतलेली सेवा व्यवस्थित, विनाखंड दर्जेदार स्वरुपात उपलब्ध होत आहे का, जे शीर्षक घेतले आहेत तेच वचाकांना पुरविल्या जात आहेत का, वाचकांना त्या बाबतीत अडचणी येत आहेत का, वाचकांकडून सेवेचा कसा आणि किती वापर केला जात आहे यावर लक्ष ठेवणे आणि त्याचे व्यवस्थापन करणे या करिता उच्च दर्जाच्या विशिष्ट संगणकीय तांत्रिक कौशल्याची आवश्यकता भासते.

**५ ) ई-प्रकाशानाचे जतन :-**

ई-प्रकाशने वेग वेगळ्या format मध्ये तयार केलेली असतात आणि ते CD, Pendrive वा संगणकाच्या hard disc मध्ये साठवून ठेवलेली असतात आणि या सर्व माध्यमांचे जतन करणे जिकरीचे काम आहे. या सर्वांवर धूळ, माती, उष्णता, दमटपणा, थंडी आजूबाजूचे वातावरण याचा परिणाम होत असतो. शिवाय शोर्टसर्किट होणे, आग लागने, त्या माध्यमांना वारंवार हात लागणे, पडणे अशा मनुष्यजन्य कारणानेही ते साठविलेले साहित्य नष्ट होण्याची भीती असते. शिवाय ज्या माध्यमांमध्ये ई-प्रकाशने साठविली जातात त्यांच्याही आयुष्याची खात्री देता येत नाही. त्यामुळे ई-प्रकाशानाचे जतन करणे जिकरीचे काम आहे.

**ग्रंथपालांना भेडसावणाऱ्या काही वित्तीय समस्या :-**

**१ ) विशिष्ट शीर्षकावर वारंवार खर्च:-**

ई-प्रकाशनाच्या बाबतीत प्रकाशकांकडून ग्रंथालयांना विशिष्ट कालावधी करिता सभासदत्त्व दिले जाते आणि तेवढ्याच कालावधी करिता प्रकाशकांकडून ई-प्रकाशने ग्रंथालयाला पुरविली जातात. हा कालावधी समाप्त झाला की

प्रकाशकाकडून सेवा समाप्त केली जाते. सेवा समाप्त होताच सदर ग्रंथ/ वाचन साहित्य ग्रंथ संग्रहात दिसेनासे होते. असे साहित्य पुन्हा वाचनालयात उपलब्ध करण्याकरिता त्यावर वारंवार फी भरावी लागते ते ग्रंथालय करिता आर्थिक अडचणीचे ठरते.

**२ ) संगणक तंत्रज्ञानांवर होणारा खर्च :-**

ग्रंथालयांना प्रकाशकांकडून घेतलेली ई-प्रकाशने आपल्या ग्रंथालयातून वाचकांना उपलब्ध करून देण्याकरिता उच्च दर्जाचे संगणक, अति जलद इंटरनेट जोडणी, e-resource lab यावर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो आणि जर विद्यापीठाची स्वतः ची ई-प्रकाशने वाचकांना उपलब्ध करून द्यावयाची असल्यास त्याकरिता लागणारे संसाधन, तंत्र, DRMS, तंत्रज्ञ यावर वेगळा खर्च करावा लागेल शिवाय वरील सर्व प्रणालीचा दैनंदिन व्यवस्थापन, मेंटेनन्स आणि देखभालीवर करावा लागणारा अविरत खर्च याचाही बोझा ग्रंथालय प्रशासनाला सोसावा लागतो.

**निष्कर्ष :-**

1) ई-प्रकाशनाच्या बाबतीत ग्रंथालय केवळ सेवा घेणारे ग्राहक असते प्रकाशित शीर्षकावर / ग्रंथावर ग्रंथालयांनी किमत/ फी भरूनही विशिष्ट कालावधी संपताच ग्रंथालयाचा कुठलाही अधिकार नसतो किवा ते ग्रंथ छापील ग्रंथाप्रमाणे ग्रंथालयात उपलब्ध नसतात.
2) सभासदत्त्वाचा कालावधी संपल्यानंतर विशिष्ट शिर्षक ग्रंथालयात उपलब्ध करून घेण्याकरिता वारंवार सभासदत्त्व फी भरावी लागते. त्यामुळे छापील ग्रंथापेक्षा ई-प्रकाशनाकरिता अधिक किमत मोजली जाते.
3) वेगवेगळ्या प्रकाशकांच्या वेगवेगळ्या अटी व शर्ती असतात त्यात एकासुत्रातेचा अभाव असतो. त्यामुळे एकाच वेळी वेगवेगळ्या प्रतिष्ठानांची सेवा ग्रंथालयात उपलब्ध करून घेतांना त्यात मेल बसविण्याकरिता वेगवेगळे निर्णय घ्यावे लागतात आणि ते ग्रंथालय प्रशासनाच्या दृष्टीने अडचणीचे ठरते.
4) ई-प्रकाशनात अभ्यासक्रमाच्या क्रमिक शीर्षकांचा अभाव आहे. त्यामुळे अनावश्यक ई-प्रकाशनावर खर्च करणे ग्रंथालयांना आर्थिक दृष्ट्या परवडणारे नाही.
5) ई-प्रकाशने वाचण्याकरिता सर्वांकडे सक्षम साधन उपलब्ध असेलच असे म्हणता येत नाही. अशावेळी अभ्यासकांकरिता वाचनालयांना पुरेशा प्रमाणात संगणकांची मांडणी वाचन कक्षातून करावी लागेल आणि व्यवस्थापनाला अशा संसाधनांनवर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागेल.
6) ई-प्रकाशने वाचकांना उपलब्ध करून देण्याकरिता उच्च दर्जाचे संगणक तंत्रज्ञान, अतिजलद इंटरनेट सेवा, आणि संगणक क्षेत्रातील कुल कर्मचारी वर्गाची प्रकर्षाने आवश्यकता भासेल.

प्रत्येक गोष्टीचे काही गुण तर काही दोष असतात तेच ई-प्रकाशने वाचनालयातील उपलाब्धतेबाबात आहेत ती उपलब्ध करून देतांना वरील प्रमाणे काही प्रशासकीय, व्यवस्थापकीय आणि वित्तीय अडचणी येत असतात. मात्र ग्रंथपालांनी आपल्या वाचक वर्गाची आवश्यकता, उपलब्ध तंत्रज्ञान आणि काळाची गरज लक्षात घेऊन आपल्या प्रशासनाला व प्रकाशकांना विश्वासात घेऊन आवश्यकतेप्रमाने अटी व शर्ती अभ्यासून त्या अधिकाधिक आपल्या बाजूने करता येतील यावर लक्ष देऊन आपल्या ग्रंथालयात दर्जेदार, दीर्घकालीन आणि अखंड ई-प्रकाशने वाचकांना पुरविण्यास प्राधान्य देणे आवश्यक आहे.

**Recomandation :-**

1) ग्रंथपालांनी केवळ Paid सेवांच्या मागे न धावता बऱ्याच प्रकाशनांकडून मोफत फुल text downloade करण्यायोग्य ई-प्रकाशने पुरविली जातात ती आपल्या वाचनालयाकरिता संग्रहात घेवून आपल्या सभासदांना सेवा द्यावी.

2) ग्रंथपालांनी प्रकाशकांना विश्वासात घेऊन अटी व शर्ती चा अभ्यास करून त्या ग्रंथालयास साजेशा कश्या करता येतील याकरिता प्रयत्न करावे.

3) ग्रंथालयास पुरविलेल्या प्रत्येक ई शीर्षकाची निदान एक छापील प्रत ग्रंथालयात राहील याचा प्रकर्षाने विचार करावा.

4) प्रकाशकांकडून ई-प्रकाशने उपलब्ध करून घेण्या आधी सदर पुरवठादार व त्याच्याकडून दिल्या जाणाऱ्या सेवांचे गहन अध्ययन करून जिथे कुठे त्याची सेवा सुरु असेल तेथील अनुभव लक्षात घ्यावे, जेणेकरून पुढे येणाऱ्या अडचणी टाळणे शक्य होईल.

5) ई सेवा वाढविण्याच्या गडबडीने अनावश्यक शीर्षकांवर खर्च करण्यापेक्ष्या आपल्या वाचकांच्या गरजा, त्यांची मागणी लक्षात घेऊन निवडक शीर्षक/ शीर्षकातील आवश्यक प्रकरने यांची निवड करून तेवढेच दर्जेदार व दीर्घकाळ कसे उपलब्ध करता येईल यासाठी प्रयत्न करावे.

6) तंत्रज्ञान उपलब्ध करण्याची आवश्यकता असल्यास त्याची आपल्याला असलेली आवश्यकता त्याच्या गुण दोषा सह अभ्यास करून प्रशासनाला सांगावे. जेणेकरून त्याच्याशी संबंधित भविष्यातील अडचणी टाळणे शक्य होईल.

7 ) ग्रंथपालांनी विद्यापीठ प्रशासनाला विश्वासात घेऊन आपल्या येथे सुरु असलेल्या विद्याशाखांशी निगडीत स्वतःची ई-प्रकाशने तयार करून आपल्या ग्राथालयात Repository च्या माध्यमाने आपल्या वाचकंना उपलब्ध करून देणे फायदेशीर ठरेल.

अशा प्रकारे ग्रंथपाल ई-प्रकाशने/ ग्रंथ ग्रंथालयात वाचकांना उपलब्ध करून देतांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय, व्यवस्थापकीय आणि वित्तीय समस्यांवर मत करून आपल्या ग्रंथालयात ई-प्रकाशने/ ग्रंथ चे दर्जेदार सेवा आणि संग्रह विकसित करून आधुनिक काळातील ज्ञानस्रोत केंद्राच्या संकल्पनेला न्याय देऊ शकतील.

**References :-**


- *What is Big Data?* . (2022). Retrieved from Intellipaat.com: https://intellipaat.com/blog/what-is-big-data/
- Barde, V. (2014). Twenty fist Century Libraries., (pp. 43-45). Wardha.
- Bhat, W. (2018). Long-term preservation of big data: prospects of current storage technologies in digital libraries. *Library Hi-Tech*. Retrieved from (2018), "", Library Hi-Tech.
- Coursera. (2022, September 29). *4 Types of Big Data Technologies.* Retrieved from www.coursera.org: https://www.coursera.org/articles/big-data-technologies
- D.N, F. (2010). *Sanganakikaran Ani Adhunikikaran.* Pune: Universal Prakashan.
- Dini, M. (2012). Recent trends in LIS in India., (pp. 159-164). Nagpur.
- Dumbill, E. (2013). Making Sense of Big Data. *Big Data, 1*(1), 1-2. doi:https://doi.org/10.1089/big.2012.1503
- Garoufallou, E. &. (2021). Big Data: Opportunities and Challenges in Libraries: a Systematic Literature Review. *College & Research Libraries*, *82*(3), 410. doi:https://doi.org/10.5860/crl.82.3.410
- Hussain, A. (2022, Feb). Impact of big data on library services. *Library High-Tech News*. doi:https://doi.org/10.1108/LHTN-02-2022-0022

- Huwe, T. (2014). “Big Data and the Library: A Natural Fit. *Computers in Libraries, 34*(2), 17-18.
- Laney, D. (2001). 3-D Data Management: Controlling Data Volume, Velocity and Variety. *META Group Original Research Note*.
- Priti, J. (2016). Big Data: Opportunities and Challenges for Librarians. *Future librarianship* (pp. 307-311). Jalgaon: Academic Book Publication.
- Verma, E. (2022). *How Big is Big Data?: Vs of Big Data.* Retrieved from www.simplilearn.com: https://www.simplilearn.com/how-big-is-big-data-rar335-article
- *wikipeadia*. (2014, december monday). Retrieved from www.cloud computing.com: htto://www.cloudcomputing